# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM)

## थेट मुलाखत - ( WALK IN INTERVIEW )

कल्याण डोबिवली महानगरपालिका वैद्यकिय आरोग्य विभागाकडील राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत खालील संवर्गातील ३४ रिक्त पदांकरीता करार पध्दतीने एकत्रित मानधनावर भरणेकामी अर्हताधारक उमेदवारांच्या थेट मुलाखती आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

| अ. क्र. | पदनाम | एकुण रिक्त पदे | रिक्त पदांची प्रवर्गनिहाय संख्या | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा. प्र | इ.मा.व | ईडब्लुएस | खुला |
| १ | सहाय्यक परिचारीका प्रसविका (ANM) | ३४ | ४ | २ | २ | ० | १ | १ | ० | ७ | ३ | १४ |

**शैक्षणिक अर्हता, अनुभव, मानधन इत्यादी –**

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिकपात्रता व अनुभव | Age in yrs | No. of Post | Consolidated Monthly Pay(Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सहाय्यक परिचारीका प्रसविका (ANM-Auxiliary Nurse Midwifery) | • 10th Pass with ANM Course (दिड वर्षाचा कोर्स)<br>• Experience will be preferred Registration with MNC | 18 To 65 yrs. | 34 | 18000/- |

**शासन निर्देशानुसार निवड होणाऱ्या उमेदवारास नियुक्त पदावर हजर होतेवेळी खालीलप्रमाणे बाबी बंधनकारक राहतील.**

1) A Mobile contact number working for incoming calls at least during duty hours.
2) Should reside at the duty headquarter
3) Should be computer literate
4) Should have PAN/Aadhar card number
5) Mobile No and Adhar Linked bank account in nationalised bank.

**सर्वसाधारण सुचना:–**

**(अ) अर्ज स्विकारण्याचा व थेट मुलाखतीचा दिनांक व वेळ :–**

| अ.क्र. | पदनाम | थेट मुलाखतीचा दिनांक | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक परिचारीका प्रसविका (ANM-Auxiliary Nurse Midwifery) | दि. ११/०४/२०२२<br>वार सोमवार | (१) अर्ज स्विकारण्याची वेळ : सकाळी ९.०० ते १०.३०<br>अर्ज छाननीची वेळ :सकाळी १०.३० पासून |
| | | दि. १२/०४/२०२२<br>वार मंगळवार | (२) अर्ज छाननीची वेळ : सकाळी १०.०० पासून पुढे<br>(३) मुलाखतीची वेळ : दुपारी ११.०० पासून पुढे |

**टिप:–** ज्या दिवशी, ज्या पदासाठी थेट मुलाखत आयोजित करण्यात आली आहे, त्या पदासाठीचेच अर्ज सकाळी ९.०० ते १०.३० वाजेपर्यंत उपस्थित असणाऱ्या उमेदवारांकडून स्विकारण्यांत येतील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**(ब) मुलाखतीचे ठिकाण** :– आचार्य अत्रे रंगमंदिर, कॉन्फरन्स हॉल, पहिला मजला, कै.शंकरराव झुंझारराव संकुल सुभाष मैदानाजवळ, शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम), ता.कल्याण, जि.ठाणे

**(क)** जाहिरातीमधील पदसंख्या, आरक्षण यामध्ये बदल होऊ शकतो आणि त्यानुसार यामध्ये वाढ/कमी करण्याचे अधिकार, तसेच विहित केलेला थेट मुलाखतीचा दिनांक व वेळ, ठिकाण इत्यादीमध्ये कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांना राहतील.

**अटी व शर्ती :–**

(१) सोबतच्या नमुन्यातील परिपूर्ण भरलेला अर्ज आणि खालील कागदपत्रांसह उमेदवाराने थेट मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहावे. (पासपोर्ट साईज २ फोटो, फोटो आयडी.– मतदान ओळखपत्र/आधारकार्ड इत्यादी, जन्मतारखेचा दाखला, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र व मार्कशिट (शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका आवश्यक आहे.) अनुभव प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, वैधता प्रमाणपत्र, रहिवास प्रमाणपत्र, मुलाखतीच्या अनुषंगाने इतर कागदपत्र यांच्या मुळ व सत्यप्रत साक्षांकित प्रती). **कोणत्याही सबबीवर मूळ कागदपत्रांशिवाय मुलाखतीस पात्र ठरविले जाणार नाही** याची नोंद घ्यावी. तसेच मुलाखतीवेळी सादर केलेल्या कागदपत्रांपैकी कोणतेही कागदपत्र खोटे/ चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवाराची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल. तसेच अर्ज दाखल करण्यास/मुलाखतीस उपस्थित राहिल्याबद्दल उमेदवारांना कोणत्याही प्रकारचे प्रवासभाडे अथवा भत्ता देय राहणार नाही.

(२) निवड होणाऱ्या उमेदवारांना आदेशाच्या तारखे पासून २९ जुन २०२२ पर्यत नियुक्ती देण्यात येईल. त्यानंतर १२ महिन्याकरीता करारपध्दतीने पुर्ननियुक्ती देण्यात येईल सदरहू पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने केवळ प्रकल्प कालावधी पुरते भरावयाची असून प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील. तसेच नियुक्तीच्या कालावधीमध्ये उमेदवारांचे काम समाधानकारक न आढळल्यास तसेच कोणत्याही स्वरुपाची गैरवर्तणूक केल्यास कोणतेही कारण न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.

(३) मागासवर्गीय संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या पदावर इतर संवर्गातील उमेदवाराची निवड करण्यात येईल.

(४) एएनएम पदांची वयोमर्यादा ६५ वर्ष राहील.

(५) सदरहू पदे एनयुएचएम अंतर्गत असल्याने त्यांचा कल्याण डोंबिवली महापालिका आस्थापनेशी कोणत्याही प्रकारचा संबंध राहणार नाही. तसेच निवड होणाऱ्या उमेदवारास कल्याण डोंबिवली महानगरपालिका आस्थापनेवरील कोणत्याही पदावर हक्क सांगणेकामी कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

(७) शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत असणारा अनुभव असणारे पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास अशासकीय, खाजगी संस्थांचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

(८) उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यांत येईल.

(९) निवड/नियुक्ती संदर्भात अंतिम अधिकार अध्यक्ष तथा आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांना राहतील आणि निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार त्यांनी राखून ठेवले आहे.

(१०) आरक्षण स्थितीमधे काही बदल असल्यास त्यामधे बदल करण्याचे आणि अधिकार अध्यक्ष तथा आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांना राहतील.

सदर जाहिरात कल्याण डोंबिवली महानगरपालिका नोटीस बोर्ड आणि www.kdmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, सदरहू भरती प्रक्रिये संदर्भात अधिक माहिती सदरहू संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(डॉ.विजय सूर्यवंशी)
आयुक्त तथा अध्यक्ष (एनयुएचएम)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण